जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ८६९ दिनांक - १४/१२/२०२३**

विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर

## आदर्श अनिल चौधरी (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०४ साथीदार यांचेवर मकोका कारवाई

दिनांक ११/११/२०२३ रोजी रात्रौ २३/१० वा.एच.पी.पेट्रोल पंप,लोहगाव-वाघोली रोड,लोहगाव,पुणे या ठिकाणी फिर्यादी हे त्यांचे सहका-यासह पेट्रोल पंपाच्या ऑफिसमध्ये असताना तोंडाला कपडा बांधुन आलेल्या चार अज्ञात इसमांनी ऑफिसमध्ये अनाधिकृतपणे प्रवेशकरुन लोखंडी हत्याराचा धाक दाखवुन जबरदस्तीने जुलमाने वर नमुद एकुण २८,८७०/- रुपये रोख रक्कम घेवुन तसेच फिर्यादी व त्यांचे सहकारी यांचे मोबाईलचे नुकसान करुन चोरी करुन पळुन गेले आहेत.म्हणुन अनोळखी इसमांविरुध्द कायदेशीर फिर्याद दिल्याने विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर गु.र.नं.५८१/२०२३ भादंवि कलम ३९५,३९२,४२७,४५२,१२० ब ३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) प्रमाणे व महा.पो.का.कलम ३७ (१)(३)१३५ प्रमाणे गुन्हा नोंद करणेत आला आहे.

दाखल गुन्हयांचे तपासा दरम्यान निषन्न आरोपी नामे **१)आदर्श अनिल चौधरी,वय २१ वर्षे रा.लोणावळा वर्साली हॉटेल ओम पॅलसच्या मागे पुणे (टोळी प्रमुख) २)अशुतोष संतोष साठे,वय २२ वर्षे रा.मु.वाळेण कोळवण ता.मुळशी जि.पुणे ३)आकाश हरेंद्र शर्मा,वय १९ वर्षे,रा.काळुराम खांदवेनगर पवार वस्ती,लोहगाव,पुणे ४)राहुल नानाभाऊ तायडे,वय २० वर्षे रा.मु.पो.वाकसे लोणावळा,ता.मावळ जि.पुणे ५)संजय मारूती चव्हाण,वय २२ स्वराज्यनगर डेकर कॉलनी रोड वलवण,ता.मावळ,जि.पुणे** यांनी केला असल्याचे निष्पन्न झाल्याने **अ.क्र.०१ ते ०४ यांना गुन्हयांचे कामी अटक करण्यात आली आहे.** अ.नं.५ हा पाहिजे आरोपी आहे.

नमुद आरोपी १)आदर्श अनिल चौधरी (टोळी प्रमुख) यांचे विरुध्द एकुण ०२ गुन्हे दाखल असुन आरोपी २)आशुतोष संतोष साठे यांचे विरुध्द एकुण ०२,गुन्हे ३)आकाश हरेंद्र शर्मा ०२ गुन्हे ४)संजय मारूती चव्हाण ०२ गुन्हे दाखल आहे.वरील ०५ आरोपी यांनी एकत्रितरित्या गुन्हे केले असल्याचे निष्पन्न झालेले आहे. यांतील टोळी प्रमुख आरोपी याने त्याचे साथीदारांसह स्वतःचे गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व दहशत प्रस्थापित ठेवण्यासाठी संघटित गुन्हेगारी संघटनेचा प्रमुख म्हणुन किंवा संघटनेच्या वतीने एकटयाने किंवा संयुक्तपणे गंभीर दुखापत,खुनाचा प्रयत्न,जबरी चोरी,खंडणी,घातक शस्त्र,सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अशा प्रकारचे गुन्हे करुन सर्वसामान्य जनतेमध्ये दहशत निर्माण केली आहे.यातील नमुद आरोपी यांचेविरुध्द वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करुन देखील त्यांनी पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटीत पणे दहशतीच्या मार्गाने स्वतःच्या अर्थिक फायदया करीता सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने प्रस्तुत गुन्हयास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियत्रंण अधिनियम १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२)३(४) प्रमाणे अंतर्भाव करणेकामी मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर,श्री आनंदराव खोबरे यांनी मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-०४,पुणे शहर,श्री शशीकांत बोराटे यांचे मार्फतीने,मा.अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन विमानतळ पोलीस स्टेशन,पुणे शहर येथे गु.र.नं.५८१/२०२३ भादविक. ३९५,३९२,४२७,४५२,१२०(ब),३४ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयांत महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणे चा अंतर्भाव करण्याची मा.अप्पर पोलीस आयुक्त पुर्व विभाग पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मंजुरी दिलेली आहे.

दाखल गुन्हयांचा पुढील तपास मा.सहाय्यक पोलीस आयुक्त येरवडा विभाग,पुणे शहर श्री.संजय पाटील हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.रितेश कुमार,मा.पोलीस सह आयुक्त,अतिरिक्त कार्यभार,अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे शाखा श्री.रामनाथ पोकळे.अप्पर पोलीस आयुक्त पुणे शहर.मा.अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा,मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-०४ पुणे शहर श्री.शशिकांत बोराटे,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त येरवडा विभाग,पुणे शहर श्री.संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमानतळ पोलीस स्टेशन,पुणे शहर श्री.आनंदराव खोबरे,पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्रीमती.संगिता माळी,सहा.पो.नि.श्री विजय चंदन, ढावरे,सर्व्हेलन्स पथकांतील पोलीस उप-निरीक्षक,एस.एस.कोळ्ळुरे व पोलीस अंमलदार, उमेश धेंडे, शिंदे, भोर, मांजरे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवुन,शरीराविरुध्द व मालमत्ते विरुध्द गुन्हे करणारे व समाजा मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल,यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ९७ वी कारवाई आहे.**